**CNR No :- MHSI100001132023**

खटला दाखल तारीख – ०५/०६/२०२३.
खटला नोंदणी तारीख – ०५/०६/२०२३.
निकाल तारीख – ११/०३/२०२६.
कालावधी – वर्षे : महिने : दिवस.
०२ : ०९ : ०६.

| | |
|---|---|
| **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय, दोडामार्ग. ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग.** | |
| (पीठासीन अधिकारी वाय. पी. बावकर)<br>(अधिघोषित दिनांक – ११.०३.२०२६)<br>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५३/२०२३<br>निशाणी क्र. ०६ लगत | |
| प्रथम खबर अहवाल गुन्हा क्रमांक – ३७/२०२३, दि.२०.०३.२०२३.<br>पोलीस ठाणे, दोडामार्ग. | |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे, दोडामार्ग. |
| सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्री. ए. व्ही. पेडणेकर |
| आरोपी | संतोष राजाराम गवस,<br>वय ५३ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. उसप, मधलीवाडी,<br>ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग. |
| आरोपीतर्फे वकील | श्री. बी. व्ही. नाईक. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २०.०३.२०२३. |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २०.०३.२०२३. |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०५.०६.२०२३. |
| गुन्ह्याचा दोषारोप नोंदवल्याची तारीख | १२.०७.२०२३. |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०९.११.२०२३. |
| न्यायनिर्णय राखून ठेवण्याची तारीख | ११.०३.२०२६. |
| न्यायनिर्णय तारीख | ११.०३.२०२६. |

| | |
|---|---|
| शिक्षा सुनवल्याची तारीख, असल्यास | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपीचा क्र. | आरोपीचे नाव | आरोपीच्या अटकेची तारीख | आरोपीची जामीनावर मुक्तता झाल्याची तारीख | आरोपी विरुद्ध निश्चीत करण्यात आलेले गुन्हे | आरोपींची निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरवण्यात आले | आरोपीस सुनावण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार संपरीक्षेच्या कालावधीमध्ये आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. संतोष राजाराम गवस | निरंक | १२.०७.२०२३. | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

याकामी अभियोगपक्षाने आरोपींविरूध्दचे दोषारोप शाबीत करण्याकरीता खालीलप्रमाणे तीन साक्षीदार तपासले.

अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :-

| साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | फटी धनाजी गवस | पंच |
| २. | स्वप्नील सखाराम पांगम | फिर्यादी |
| ३. | रामदास लाडू जाधव | तपासीक अंमलदार |

ब) बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :-

| साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :-

| साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी

अ) अभियोग पक्ष :-

| अ.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| ०१. | P-1/PW2 | दि.२०.०३.२०२३ रोजीची फिर्याद. |
| ०२. | P-2/PW3 | दि.२०.०३.२०२३ रोजीचा पंचनामा. |
| ०३. | P-3/PW3 | दि.२०.०३.२०२३ रोजीची मुद्देमाल पावती. |
| ०४. | P-4/PW3 | दि.२०.०३.२०२३ रोजीची आरोपी नोटीस. |
| ०५. | P-5/PW3 | दि.२५.०५.२०२३ रोजीचे न्यायसहाय्यक प्रयोगशाळा, कोल्हापूर यांना दिलेले अग्रेषीत पत्र. |

ब) बचाव पक्ष :-

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क) न्यायालयीन निशाणी :-

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड) मुद्देमाल तपशील :-

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## -: न्यायनिर्णय :-

(दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी घोषित केला)

अभियोग पक्षाने आरोपीच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ कलम ६५(ई) च्या गुन्ह्यासाठी प्रकरण चालविले आहे.

**अभियोग पक्षाची केस थोडक्यात खालीलप्रमाणे –**

०२. दि.२०.०२.२०२३ रोजी फिर्यादीस मिळालेल्या विश्वसनीय बातमीच्या अनुषंगाने दोडामार्ग तालुक्यातील उसप येथील बापुसाहेब देसाई विद्यालयाच्या

समोरील बाजुला सायंकाळी ०६:४५ वा.चे सुमारास दारुबंदी गुन्ह्यांतर्गत छापा घातला असता तेथील झाडाच्या आडोशाला आरोपीच्या ताब्यातील प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये गोवा बनावटी दारुच्या डिलक्स कॅश्यु फेणी-७७ च्या १८० मिली मापाच्या १२ प्लॅस्टीक बाटल्या असा मद्यनिषेध मुद्देमाल मिळून आला व सदरचा मुद्देमाल चोरटा दारुचा व्यवसाय करण्याचे उद्देशाने गैरकायदा व बिनापरवाना आरोपीने बाळगल्याने फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद आरोपी विरुद्ध दाखल केली.

०३. फिर्यादीने दाखल केलेल्या तक्रारीनुसार आरोपी विरुद्ध दोडामार्ग गुन्हा रजिस्टर क्र.३७/२०२३ चा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९८९ चे कलम ६५(ई) अन्वये नोंद झाला. सदर गुन्हयाचे तपासकाम रामदास लाडू जाधव यांचेकडे सोपविण्यात आले. तपासकामी त्यांनी घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा केला, मुद्देमाल कारकुनांकडे मुद्देमाल जमा करुन तशी पावती केली, नमुना मुद्देमाल प्रत्यंतराकरीता पाठविला, आरोपीस समजपत्र पारीत केले, साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली व आरोपी विरुद्ध सबळ पुरावा प्राप्त झाल्याने त्यांनी आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपीची **नि.क्र.०६** येथे संक्षिप्त संपरिक्षा नोंदविली, त्याने गुन्हा अमान्य केला व अभियोग चालविण्याची विनंती केली.

०५. प्रस्तुतचे प्रकरण नाम. उच्च न्यायालय मुंबई पत्र क्र. B(Gen)1001/2026/223 दि.१८.०२.२०२६ तसेच मा. जिल्हा न्यायालय

सिंधुदुर्ग ओरोस यांचेकडील ई-मेल जा.क्र.Admn./671/2026 दि.२०.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये स्पेशल ड्राईव्हमध्ये ठेवण्यात आलेले आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५८ प्रमाणे न्यायालयासमोर सादर पुराव्यावरुन समाधानकारक पुरावा पटलावर दिसत नसेल तर सदर कलमांतर्गत प्रकरण थांबवुन आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. या कारणास्तव आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ (1)(b) अन्वये निवेदन नोंदविले नाही.

०६. सदर कामी दाखल असलेले दोषारोपपत्र, अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेला साक्षीदार, लेखी व तोंडी पुरावा यावरून खालील मुद्दे माझे अवलोकनार्थ समोर येतात. सदरचे मुद्दे, त्यांचे निष्कर्ष व त्यावरील कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.२०.०२.२०२३ रोजी फिर्यादीस मिळालेल्या विश्वसनीय बातमीच्या अनुषंगाने दोडामार्ग तालुक्यातील उसप येथील बापुसाहेब देसाई विद्यालयाच्या समोरील बाजुला सायंकाळी ०६:४५ वा.चे सुमारास दारुबंदी गुन्ह्यांतर्गत छापा घातला असता तेथील झाडाच्या आडोशाला आरोपीच्या ताब्यातील प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये गोवा बनावटी दारुच्या डिलक्स कॅश्यु फेणी–७७ च्या १८० मिली मापाच्या १२ प्लॅस्टीक बाटल्या | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | मिळुन आल्या व सदरचा मद्यनिषेध मुद्देमाल चोरटा दारुचा व्यवसाय करण्याचे उद्देशाने गैरकायदा व बिनापरवाना बाळगुन आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला ? | |
| २. | अंतिम आदेश काय ? | आरोपीची अंतीम आदेशान्वये निर्दोष मुक्तता करणेत येते. |

**–:: <u>कारणमिमांसा</u> ::–**

**<u>मुद्दा क्र. १ व २</u> :–**

(वरील दोन्ही मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे व एकाच घटनेशी संबंधीत असल्याने, तथ्यांची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन न्यायाच्या दृष्टीकोनातून एकत्रीतपणे करण्यात येत आहे.)

०७. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने पंच, फिर्यादी व तपासीक अंमलदार या साक्षीदारांना तपासले आहे. प्रस्तुत प्रकरणातील पंच फटी गवस (स.सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात, तयार पंचनाम्यावर सही केली व मजकुराबद्दल माहिती नसल्याचे कथन केले. त्यामुळे सदर साक्षीदाराद्वारे आरोपी विरुद्ध कोणतीही माहिती पटलावर आलेली नाही.

०८. आरोपी विरुद्धची फिर्याद शाबीत करण्याकरीता अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी स्वप्नील पांगम (स.सा.क्र.२) यांची साक्ष नोंदविली. फिर्यादीने आपल्या साक्षीपुराव्यात दाखल फिर्याद नुसार मिळती–जुळती साक्ष दिली व नि.क्र.P1/PW2 वरील फिर्याद न्यायकक्षात ओळखली. त्यानंतर

अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणातील तपासीक अंमलदार रामदास जाधव (स.सा.क्र.३) यांची साक्ष नोंदविली. त्यांनी साक्षीपुराव्यात नि.क्र.P2/PW3 वरील घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा, नि.क्र.P3/PW3 वरील मुद्देमाल पावती, नि.क्र.P4/PW3 वरील आरोपीस पारीत केलेली नोटीस व नि.क्र.P5/PW3 वरील न्यायसहाय्यक प्रयोगशाळा, कोल्हापूर यांच्याकडे नमुना प्रत्यंतराकरीता पाठविणे करीताचे अग्रेषीत पत्र या बाबी न्यायकक्षात ओळखल्या आहेत. त्यानंतर अभियोग पक्षाने दि.१४.११.२०२४ रोजी नि.क्र.२० कडे तोंडी पुरावा संपल्याबाबतची पुरशीस दाखल केली.

०९. न्यायालयासमोर आलेलया पुराव्याचे अवलोकन केले. अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणातील दुसरे पंच, नमुना वाहक, मुद्देमाल कारकुन, तसेच गुन्हयाच्या वेळी पोलीस साक्षीदारां व्यतिरीक्त उपस्थित असणारे त्रयस्थ इसम असे महत्वाचे साक्षीदार तपासण्यास असमर्थ ठरलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाकार्य केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीपुराव्या आधारे घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही. अभियोग पक्षाने तपासीक अंमलदार रामदास जाधव (स.सा.क्र.३) यांच्या साक्षीपुराव्या आधारे घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा शाबीत करण्याचा प्रयत्न केला. परंतु, सदर साक्षीदाराने केवळ दोन पंच शिवराज सुतार व फटी गवस यांच्या समक्ष १८:४५ ते १९:२५ या वेळेत पंचनामा केल्याचे कथन केले. त्यांनी घटनास्थळाचे योग्य वर्णन, आजुबाजुची परीस्थिती, जप्त मुद्देमालाचे वर्णन, प्रकार,

किंमत, प्रमाण याबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराने दिलेल्या अपुऱ्या साक्षीपुराव्या आधारे घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा योग्यरीत्या शाबीत झालेला नाही. सर्वात महत्वाची बाब म्हणजे, प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रत्यंतराबाबतचा अहवाल दाखल नाही. अशा परीस्थितीत जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुन मिळून आला व तो मूद्देमाल हा मद्यनिषेध मुद्देमाल आहे, हे सिद्ध झाले नाही व त्या संदर्भात कोणताही भक्कम पुरावा अभियोग पक्षास सादर करता आलेला नाही.

१०. वरील कारणास्तव प्रकरण पुढे चालु ठेवुन काही साध्य होणारे नाही. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५८ प्रमाणे प्रकरणाचे कामकाज थांबवणे संयुक्तीक ठरते. सबब, एकंदरीत पुरावा लक्षात घेता दि.२०.०२.२०२३ रोजी दोडामार्ग तालुक्यातील उसप येथील बापुसाहेब देसाई विद्यालयाच्या समोरील बाजुला सायंकाळी ०६:४५ वा.चे सुमारास आरोपी बेकायदेशीररीत्या दारुची विक्री करत असल्याबाबतची बाब शाबीत न झाल्याने, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

**–: आ दे श :–**

१. प्रस्तुतचे प्रकरण फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५८ अन्वये बंद करण्यात येत आहे.

२. आरोपी संतोष राजाराम गवस, वय ५० वर्षे, रा. उसप, मधलीवाडी, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग याला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अंतर्गत दाखल

गुन्हयातुन, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५8 अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

३. आरोपीचे वैयक्तिक व जामीनदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येतात.

४. दोषारोपपत्रातील नमूद अ.क्र. ०१) गोवा बनावटीच्या डिलक्स कॅश्यु फेणी ७७ असे लेबल असलेल्या १८० मिली मापाच्या दारुने भरलेल्या प्लॅस्टीकच्या एकुण १२ बाटल्या हा जप्त मुद्देमाल अपील कालावधी पूर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करणेसाठी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, सिंधुदुर्ग यांच्याकडे पाठविणेत यावा.

५. उपरोक्त नमुद मुद्देमाल ठेवण्याकरीता वापरण्यात आलेली प्लॅस्टीकची पिशवी हा मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील कालावधी पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.03.11 15:45:26 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)
दिनांक – ११.०३.२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग – १, दोडामार्ग.

**प्रमाणपत्र**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | नरेंद्र गोविंद प्रभु. |
| न्यायालय | न्यायदंडाधिकारी वर्ग–१, दोडामार्ग |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | ११.०३.२०२६. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेचा दिनांक | ११.०३.२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केलेचा दिनांक | ११.०३.२०२६. |